# दुटप्पी कीं दुहेरी
# आणि
# विविध लेख

लेखक

**कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**दुटप्पी कीं दुहेरी आणि विविध लेख : श्री.कृ. कोल्हटकर**
© **सुरक्षित**
**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
अरुणा चव्हाण/शिल्पा कुलकर्णी

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २६०/-

# प्रकरण १ ले

नाशिक येथील ‘प्रकाश’ या प्रसिद्ध साप्ताहिकाच्या एका अंकात ‘गृह्य संस्कार’ या सदराखाली खालील मजकूर प्रसिद्ध झाला :

‘‘या साप्ताहिकेचे संपादक श्री. हरिहर विद्याधर जोशी यांच्या पत्नी सौ. सुभद्राबाई या ता. ....................रोजी आपल्या पतीस व पाच वर्षांच्या अजाण बालकास विरहांत लोटून स्वर्गवासी झाल्या.’’

त्यानंतर दोन आठवड्यांनी त्याच साप्ताहिकाच्या अंकात ‘पाहिजे’ या सदराखाली खालील जाहिरात प्रसिद्ध झाली:-

‘‘एका अल्पवयी व मातृविहीन बालकाचे संगोपन करण्यास व त्यांस शिक्षण देण्यास एक सुविद्य, सुशील व सुस्वभावी बाई पाहिजे. पगार दरमहा पन्नास रुपये मिळेल. शिवाय राहावयास जागा व अन्न-वस्त्रही मिळेल. पत्रव्यवहार ‘प्रकाशा’च्या संपादकाच्या नांवें करावा.’’

बाई खुद्द संपादकाच्या मुलाकरितां पाहिजे होती हे सदरहू दोन मजकूर वाचणारांच्या सहज लक्षात येण्यासारखें होते.

लवकरच संपादकांकडे गरजू बायांची पत्रें येण्यास सुरवात झाली. कित्येकींनी आपल्या पत्रांत स्वत:च्या विद्येची व शीलाची भरपूर प्रशंसा केली असून सोबत शिफारसपत्रेंही पाठविलीं होतीं. पण पगाराच्या कमीपणाबद्दल असमाधान व्यक्त केलें होतें. कित्येक विद्याशीलसंपन्न स्त्रियांची पगाराबद्दल जरी कुरकुर नव्हती तरी त्यांनीं दिवसांतून तीन वेळां चहा मिळाला पाहिजे, वाटेल तितक्या वेळां नाटकांस जाण्याची मोकळीक पाहिजे, उंची लुगडीं नेसावयास मिळालीं पाहिजेत, अशा

अनेक अटी घातल्या होत्या. काहीं जणींचें अक्षर सुंदर व वाक्यरचना निर्दोष असून स्वभाव मात्र तेढा असावा असें त्यांच्या पत्रांवरून अनुशिष्यासमोर कित्त्यादाखल मांडलीं जाण्याचा संभव नव्हता, आणि शब्दांची रूपें व वाक्यरचना इतकी अशुद्ध होती कीं त्यांची पत्रें त्यासमोर अशुद्धें सुधारण्याकरितांच ठेवणें शक्य होतें. तथापि वळणदार अक्षरांतील व नमुनेदार भाषेंतील त्यांचीं उणीव त्यांच्या कुर्रेबाज चेहऱ्यांनीं व झोंकदार नेपथ्यनैपुण्यानें बरीच भरून निघेल असा त्यांनी पाठविलेल्या फोटोंवरून अजमास होत होता. अल्पवयी बालकाबरोबर त्याच्या पित्याचेंही संगोपन आपल्याकडेच यावयाचें आहे, असा त्या स्त्रियांनीं कयास बांधला होता कीं काय न कळे! असो.

लवकरच हरिहररावांजवळ असे पुष्कळ फोटो जमले. त्यांतील बऱ्याच स्त्रियांचे चेहरे चित्ताकर्षक होते. पण एका चेहऱ्यावर गर्विष्ठपणा तर दुसऱ्यावर दैन्य, एकावर हेकेखोरपणा तर दुसऱ्यावर चंचलपणा, एकावर अरेरावीपणा तर दुसऱ्यावर परावलंबन, एकावर निष्ठुरपणा तर दुसऱ्यावर भेंकडपणा, एकावर मायावीपणा तर दुसऱ्यावर खुळचटपणा, एकावर स्वार्थबुध्दि तर दुसऱ्यावर अदूरदर्शित्व, एकावर फाजील चौकसबुध्दि तर दुसऱ्यावर पाषाणतुल्य निर्विकारता, याप्रमाणें कोणता ना कोणता तरी दोष दिसून येई. फोटो काढतेवेळीं धारण केलेलें हास्य प्रत्येक चेहऱ्यावर झळकत होतें. पण ज्याप्रमाणे चलत्‌चित्रपटाच्या एकाच प्रकाशित भागावर अनेक भिन्न प्रकृतीच्या व्यक्ति व्यक्त होऊ शकतात त्याप्रमाणें एकच हास्य निरनिराळ्या फोटोत अहंकार, खुनशीपणा, कपट, तामसी महत्त्वाकांक्षा इत्यादि भिन्नभिन्न दुर्गुणांचे द्वार बनलें होतें. काहीं चेहरे तर कोल्ह्याचा धूर्तपणा, सापाचा खुनशीपणा, लांडग्याचा क्रूरपणा, गिधाडाचा अधाशीपणा इत्यादि अनेक पाशवी दुर्गुणांचे पिंजरेच वाटत. अशा स्त्रियांच्या स्वाधीन आपला आवडता बाबू करण्यापेक्षां तो आपल्या अडाणी नोकरांच्या संगतींत आहे तसाच पुढेही राहिला तरी पुरवला असे हरिहररावांस वाटे. चेहऱ्याप्रमाणें अक्षराच्या वळणावरून स्वभाव ओळखण्याची कलाही त्यांच्या अंगीं अनेक वर्षांच्या अनुभवावरून आली होती. आणि त्यांजकडे आलेल्या पत्रांच्या अक्षरांवरून कोणती स्त्री मोकळ्या स्वभावाची व कोणती कपटी, कोणती व्यवस्थित व कोणती अव्यवस्थित, कोणती उदार व कोणती कंजुष,

कोणती डौली व कोणती साधी हें त्यांनीं ताबडतोब पारखून ठेविलें. आपल्या प्रिय अपत्याची जबाबदारी निर्धास्तपणें सोंपविण्यासारखी एकही स्त्री त्यांस दिसून येईना.

बिचाऱ्या बाबूस मातृवियोगानें झालेल्या आपल्या हानीची फारशी जाणीव नव्हती. तो दिवसभर आपल्या खेळांतच निमग्न असे. रात्र झाली म्हणजे मात्र त्यांस चुकल्याचुकल्यासारखे होऊन तो रडूं लागे, व त्याची कितीही समजूत घातली तरी त्याचें रडें थांबत नसे. एके दिवशी संध्याकाळी हरिहरराव आपलें संपादकीय काम आटोपून व बाबूस जवळ घेऊन त्याच्या विवंचनेंत बसले असतां पोस्टाच्या शिपायानें त्यांच्या नांवाचीं पत्रें आणून दिली. त्यांतील एकावरील पत्त्याचे अक्षर अगदीं अपरिचित होतें. हें पत्र जाहिरातीनंतर लौकरच आलें असतें तर तें त्यांनीं प्रथमच फोडलें असतें. पण हा वेळपर्यंत अपरिचित अक्षरांच्या इतक्या पत्रांनीं त्यांचीं निराशा केली होती कीं, तशा पत्रांचा त्यांना कांहींसा वीटच आला होता. त्यांनी तें पत्र कांहींसें अनादरानेंच बाजूला सारिले व बाकींची पत्रें वाचण्यास पुढें ओढिलीं. त्यांपैकीं कांहींत लेखांचा स्वीकार करण्याबद्दल विनंती, कांहींत लेखांचा स्वीकार करण्याबद्दल विनंती, काही लेखांत स्वीकार केल्याबद्दल कृतज्ञता प्रदर्शन व इतरांत लेखांचा अव्हेर केल्याबद्दल शिव्याशाप होते. पण भटास ज्याप्रमाणें बारशाचा आनंद व बाराव्याचें दु:ख नसतें, जन्माची व मृत्यूची खबर पोंचविणाऱ्या टपालवाल्यास ज्याप्रमाणें तिचें सुखदु:ख बाधा करू शकत नाही, त्याप्रमाणे आशाळभूत, कृतज्ञ व निराश लेखकांच्या याचना, आभार व शाप सरावलेल्या संपादकाचा चित्तक्षोभ करूं शकत नाहींत. व हरिहररावांइतका आपल्या कामांत वाक्‌बगार संपादक त्या काळीं महाराष्ट्रांत एखादाच सांपडला असता. सर्व पत्रें वाचून झाल्यावर त्यांची दृष्टि त्यांच्या उपेक्षेस पात्र होऊन एकीकडे पडलेल्या त्या पत्राकडे वळली. व त्याचा विनाकारण अपमान केल्याबद्दल पश्चात्ताप वाटूनच कीं काय त्यांनी ते पत्र आदरानें वर उचललें व हलक्या हातानें फोडिलें. तें वाचीत असतां त्यांची मुद्रा कुतूहल, आश्चर्य, आनंद इत्यादि विकारांनी वारंवार बदलत होती. पत्र संपतांच तिजवर समाधान स्थिरावल्यासारखें दिसलें. पत्रांतील मजकूर याप्रमाणें होता:

सा.न.वि.वि.

'हे पत्र आपणांकडे जरा उशीरांच जात आहे. आपल्या चिरंजीवास सांभाळण्याचें काम पत्करण्याचा विचारच उशिरानें सुचला व तो आपणांपाशीं प्रकट करण्यापूर्वी वडिलांची अनुमती घ्यावी लागली; यामुळेंच या पत्रास इतका उशीर लागला. आपण आपल्या मुलाकरितां यापूर्वीच बाई ठेवली नसेल तरच हे पत्र वाचून पाहावें. ठेविली असल्यास हें न वाचताच फाडून टाकावें.

आपल्या मुलाची सर्वतोपरी जोपासना करण्यास मी तयार आहे. त्यास बौध्दिक शिक्षण देण्याइतकें ज्ञान मीं संपादन केलें आहे. त्यास धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याची माझ्यांत पात्रता आहे कीं काय याचा निर्णय अनुभवाअंतीच होणार आहे. आपण देऊ केलेला पगार एका दृष्टीनें फारच मोठा तर दुसऱ्या दृष्टीनें अगदीच अपुरा आहे. माझ्या रहाणीच्या मानानें तो फार मोठा आहे, व मी जें शिक्षण देणार त्याचें मोल कोणत्याही रकमेपेक्षां मोठें असल्यामुळे तो पगार फारच कमी आहे. शिक्षणाचा योग्य मोबदला शिक्षणच होय. लेखन कलेंत मला शिष्यीण मानून प्रवीण करण्याचें आपण कबूल करीत असाल तरच मी आपल्या मुलास शिक्षण देण्यास तयार आहें. अन्न-वस्त्रांसंबंधानें मी एक तडजोडीची अट सुचविते: - मी स्वत:ची वस्त्रें स्वत:च्या खर्चानें पुरवावींत व पाकसिद्धीसारख्या गृहकृत्यांत मदत करून आपल्या घरीं जेवावें. ही अट आपणांस मान्य होण्यास हरकत नाहीं. माझी आणखींही एक अट आहे, व ती फारच महत्त्वाची आहे. मी कोण, माझे पूर्वचरित्र कसें गेलें व भावी काळाबद्दल माझ्या आकांक्षा कोणत्या आहेत याबद्दल मुळींच चौकशी न करण्याचे आपण अभिवचन दिलें पाहिजे. 'प्रकाशा'च्या पुढील अंकात आपली जाहिरात आली नाहीं तर आपणांस माझ्या अटी कबूल आहेत असें मी समजेन, व त्या अंकाच्या दुसऱ्याच दिवशीं सकाळीं मुंबईकडून येणाऱ्या गाडीनें मी आपणांकडे येईन.' कळावे, ही विनंती.

लेखन कलेंत आपली शिष्यीण होऊ इच्छिणारी

एक अज्ञात तरुणी

पत्राचें अक्षर सुंदर व रेखीव असून त्यावरून लेखिकेचे टापटीप, स्वच्छता, साधेपणा हे गुण दिसत होते. मजकुरावरून आज्ञाधारकपणा, नि:स्वार्थीपणा, मार्मिकता, भिडस्तपणा, उद्योगशीलता, गृहकार्यनिपुणता, चातुर्य, वक्तशीरपणा हे

गुण उघड होत होते. पत्राचा कागद स्वदेशी वापरला होता. त्यावरून लेखिकेची स्वदेशभक्तिही जाज्वल्य असावी असें दिसत होतें. टीचभर पत्रांत आपल्या अंगचे बहुतेक गुण व्यक्त करणारी ही तरुणी ती अजून आपणास अज्ञात आहे असेंच समजत आहे का? समजत असल्यास त्या गुणांच्या यादींत भोळसरपणा हाही एक गुण दाखल करावा लागेल.

पत्रासोबत लेखिकेच्या बाह्यांगाचा फोटो जरी नसला तरी पत्रांत उमटलेला अंतरंगाचा फोटो इतका चित्ताकर्षक होता कीं, हरिहररावांना पत्रासंबंधानें निर्णय करावयास मुळींच वेळ लागला नाहीं. 'प्रकाशा'च्या पुढील अंकांत जाहिरात आली नाहीं. त्याच्या दुसऱ्या दिवशीं ते मुंबईकडून येणाऱ्या गाडीची उत्कंठेने वाट पहात बसले. पत्राखालीं सही नसल्यामुळें त्यांना स्टेशनावर स्वत: जाऊन फायदा नव्हता. सबब, ते घरींच राहिले होते. आज बाई येणार म्हणून बाबू आनंदानें उड्या मारीत होता. इतक्यांत दाराशी एक टांगा उभा राहिला व त्यांतून एक तरुणी उतरली. हरिहरराव घाईघाईनें पुढें होतात तोंच तिनें सामान खालीं उतरवून टांगेवाल्यास भाड्याचे पैसे देऊन रवाना केलें. हा प्रकार इतक्या अकल्पितपणें व शीघ्रतेनें झाला कीं, गड्यास हाक मारण्यास हरिहररावांस सवडच मिळाली नाहीं. पाहुणीने वळकटी आंत आणण्यासाठीं हातीं घेतली तें पाहून त्यांनीं ती आपल्या हातांत देण्याबद्दल तिला खुणाविलें; पण ती स्वत:च आंत नेण्याचा तिचा निर्धार दिसतांच त्यांनीं तिची ट्रंक हातीं घेतली; व पुढे होऊन तिला माजघराची वाट दाखविली. टांगा दाराशीं येऊन थडकल्याबरोबर बाबू लाजेनें आत पळून गेला होता; परंतु लाजेवर जिज्ञासेचा वरपगडा होऊन तो दबकत दबकत पाहुणीच्या समोर कांहीं अंतरावर येऊन उभा राहिला होता. हरिहरराव त्यांस पकडण्याचा निष्फळ प्रयत्न करीत म्हणाले, "हाच तुमचा शिष्य." पाहुणीने वाक्य पुरें करीत म्हटलें, "आणि माझा धाकटा भाऊही. होय ना, बाळ? ये पाहूं इकडे. "

लहान मुलेंही आपल्यापरीं मानी असतात. त्यांनी बोलाविल्याखेरीज ती सहसा परक्यापाशीं जावयाचीं नाहींत. पण एकदां कां त्यांना नांवाला निमंत्रण दिलें म्हणजे तीं फारसें ओढून चंद्रबळ आणीत नाहीत. आई देवबाप्पाच्या घरीं गेल्यापासून बाबूच्या कानांवर प्रेमळ व मंजुळ शब्द पडला नव्हता. तो पडताच त्याने शिष्टाचाराची पर्वा न करतां धांवत धांवत पाहुणीबाईजवळ जाऊन तिच्या

गळ्यास मिठी मारली व ज्या सुंदर मुखातून ते मंजुळ शब्द पडले होते त्याकडे तो वारंवार निरखून पाहू लागला.

खरोखर पाहुणीचा चेहरा तिच्या स्वराइतकाच व तिचा स्वर तिच्या चेहऱ्याइतकाच मोहक होता. चेहऱ्यावर निकोप प्रकृतींचे तेज व अकृत्रिम हास्य खेळत होतें. त्यावरून तिचें निष्कलंक पूर्व चरित्र अनुमीत होत होतें. हिंदु मुलीच्या ललाटावरील रेषेवरून तिच्या वैवाहिक भाग्याची अटकळ करावयास भविष्यवादीच लागतो असें नाहीं. पाहुणीच्या भव्य भालाकाशांत कुंकुमतिलकरूपी पूर्ण चंद्रमा चमकत असलेला पाहून ही वैधव्यांधकारांत चांचपडणारी गतभर्तृका नाहीं हें स्पष्ट होत होते. तसेच गळ्यांत मंगळसूत्र नव्हतें यावरून ही अद्याप विवाहपाशांत पडलेली नाहीं हेहि उघड होत होतें. विवाह म्हणजे स्त्रीचें जीवनसर्वस्व. तत्संबंधीचें रहस्य याप्रमाणें ललाटावरून व गळ्यावरून उघड होत असतां आपलें पूर्व चरित्र येथील कोणासही माहीत नाहीं अशीच तिची समजूत असावी ना?

हा चेहरा आपण पूर्वी कधीं पाहिला असावा अशी हरिहररावांस एकदां शंका आली. पण सुंदर चेहरा प्रथमदर्शनींच मनांत ठसून स्मृतिभूमींत इतका खोल जाऊन बसतो कीं तिच्या बालपणींच्या थराशीं त्याचा संबंध असावा असें वाटूं लागते, असें त्यांनी आपल्या शंकेचे समाधान करून घेतले.

पाहुणीबाईची यजमानांशी व त्यांच्या मुलाशीं ओळख होते न होते तोच घरांतून स्वयंपाकीण बाळूबाई व गडी बजाबा ही बाहेर आली. ज्या काळात स्वामीसेवकसंबंध वंशपरंपरा चाले त्या काळचा ती अवशेष होती. ते संबंध संकेतसिद्ध नसून जन्मसिद्ध असल्यामुळें सेवकांना यजमानांच्या कुटुंबाबद्दल आपलेपणा वाटे व प्रसंगी ते त्यांजवर हुकमतही गाजवीत. हरिहररावांच्या वृद्ध सेवकांनी त्यांचे व त्यांच्या वडिलांचें बालपण पाहिलें होतें. त्यांनी हरिहररावांस अंगाखांद्यावर खेळविलें होतें. आणि बाबूचे संगोपन व संवर्धन करण्याचा हक्कही भोगवट्यानें आपणाकडेच आला आहे असा त्यांचा समज होता. सुभद्राबाई निवर्तल्यापासून घरचा सारा कारभार त्यांच्याच हातीं आला होता व तो दुसऱ्याच्या हातीं मुकाट्यानें जाऊं देण्याचा त्यांचा विचार नव्हता. त्यांना साक्षरतेचा गंध नसून कानांनी ऐकूंही येत नव्हतें यामुळें त्यांच्या कानी जाहिरितीची वार्ताही गेली नव्हती. आपल्या घरांत ही नवखी बाई बाबूस कुरवाळीत आहे हे पाहून त्यांना

प्रथम आश्चर्य वाटले; पण यजमानाकडून त्या सलगीचें कारण कळल्यानंतर तिचा मनापासून राग आला. त्याच्या भरांत तीं दोघें हातवारे करून तोंडास येईल ते बडबडूं लागलीं. सुदैवानें दोघांच्याही तोंडांची दांत पडून बोळकीं झालेलीं असल्यामुळें कठिण पदार्थ चावण्याच्या कामीं जसा तोंडाचा उपयोग नव्हता तसा मृदु अंत:करणाचा चावा घेण्याच्या कामींहि नव्हता. मनोगत दुसऱ्यांपाशीं प्रकट करणें हें बहिर्मुख कार्य जरी त्यांजकडून होत नव्हतें तरी राग झोकून मनास हलकें वाटावयास लावण्याचें अंतर्मुख कार्य त्यांजकडून चांगल्या प्रकारें होई. यामुळें रागाचा रोख श्रोत्यांस कळण्यापूर्वीच तो राग शांत होई. दुसरें असें कीं, उभयतांची बोबडी बडबड एकदम चालू रहात असल्यामुळें समोरासमोरून धडधडत येणाऱ्या दोन वणव्याप्रमाणे त्यांचे भडिमार इतरांना होण्यापेक्षां परस्परांसच मारक होत असत. त्यांचा इतरांवर होणारा परिणाम बहुधा हास्याच्या रूपानें बाहेर पडत असे. त्या दोघांचा पाहुणीवरील निष्फळ राग पाहून बाबू खदखदां हंसूं लागला. व ''पाहुणीबाई, आमच्या बाळूबाईची आणि बजाबाची गंमत आहे कीं नाहीं?'' असे म्हणून आळीपाळीनें दोघांचीं तोंडें दाबून धरू लागला. सर्कशींतील गुरगुरणारे सिंह एकाद्या अर्भकाची सलगी जशी निमूटपणें सहन करितात त्याप्रमाणें आपल्या मोठ्या यजमानास न बधणारीं म्हातारा-म्हातारी आपल्या चिमुकल्या यजमानाच्या लडिवाळ लीलांस तेव्हांच वश झालीं. दोघे कानांनीं बहिरीं असल्यामुळें त्यांची तोंडे बंद करण्याचे कामीं युक्तिवादाचा कांहींच उपयोग होत नसे. बाबूनें तीं दाबून धरितांच मात्र तीं आपोआप बंद होत. या खेपेसही नेहमींच्या प्रकारचीच पुनरावृत्ति झाली. बाबूच्या मध्यस्थीनें लवकरच तरुण पाहुणीचा आणि वृद्ध नोकरांचा पूर्ण सलोखा झाला. आणि तें लहानसें कुटुंब नेहमींप्रमाणें शांततेचा अनुभव घेऊ लागले.

✦

# प्रकरण २ रे

एकंदर शिक्षणांत शारीरिक शिक्षणाचें किती महत्त्व आहे याची 'बाई'स (हे कुटुंबातील मंडळींनीं पाहुणीस दिलेलें नांव असून तिचे खरें नांव कळेपर्यंत आपणही तिला याच नांवानें ओळखूं.) पूर्ण जाणीव होतीसें दिसलें. ती बाबूकडून रोज सकाळी बारा नमस्कारांचा व संध्याकाळीं खेळाचा व्यायाम नियमानें करून घेई. खेळात ती स्वत: भाग घेत असल्यामुळें तिलाही व्यायाम होई. तिला शुद्ध हवेचे महत्त्वही चांगले कळत होतें. म्हणून ती बजाबास बरोबर घेऊन सकाळ संध्याकाळ बाबूसह गोदातटाकीं किंवा गांवाबाहेर मोकळ्या हवेंत फिरावयास जाई. कधी कधी त्या त्रिकुटाबरोबर हरिहररावही सहल करावयास जात. अशावेळीं नागरिकांचा त्यांजविषयींचा आदर अनेक प्रकारें प्रकट होई. हरिहरराव त्या काळाचे प्रसिद्ध सुधारक होते. त्यांचे साप्ताहिक सामाजिक सुधारणेलाच सर्वस्वीं वाहिलेलें असे. आरंभीं आरंभीं इतर सुधारकांप्रमाणें त्यांनाही समाजाकडून त्रास झाला पण, त्यांचें पवित्र आचरण, तत्त्वनिष्ठा, लहानथोरांशीं होणारें मोकळें व प्रेमळ वर्तन, त्यांजकडून गोरगरिबांस सढळ हाताने होणारी मदत इत्यादि गोष्टींचा हळूंहळूं समाजावर योग्य तोच परिणाम होत जाऊन हल्लीं ते शहरांतील एक वजनदार गृहस्थ म्हणून गणिले गेले होते. दुसऱ्या एखाद्या सुधारकाबरोबर अशी सौंदर्यसंपन्न तरुणी जातांना दिसली असती तर लोकांनीं त्यांजबद्दल कुशंका घेऊन ती नेत्रसंकेतांच्या, हास्याच्या व कुत्सित उद्गारांच्याही द्वारा व्यक्त करण्यास कमी केलें नसतें. पण त्यांचा हरिहररावांबद्दल इतका आदर होता कीं, 'बाई'चें सांनिध्य हरिहररावांच्या कुचेष्टेला कारणीभूत होण्याऐवजीं हरिहररावांचें सांनिध्य तिजबद्दल